**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ४०/२०१६-१७/४७ दिनांक: ०७-०२-२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ४०/२०१६-२०१७**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. सुशिलकुमार रविंद्र घेवारी<br>मु. पो. अंबप<br>ता. हातकणंगले, जिल्हा. सांगली | : | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, जयसिंगपूर | | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग वडगांव | | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

१) तक्रारदार श्री सुशिलकुमार रविंद्र घेवारी रा. अंबप, ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांनी सदरचे गा-हाणे दि. २७-१२-२०१६ रोजी या मंचासमोर दाखल करुन कृषिपंपासाठी नविन वीज जोडणी आणि नुकसान भरपाई मिळणेसाठी दाखल केले आहे.

## तक्रारीचे संक्षिप्त स्वरुप

२) तक्रारदार यांनी त्यांच्या गट क्र. ४५४ या शेत जमिनीमध्ये दि. ०९-०२-२०१५ रोजी कुपनलिका खोदून त्या ठिकाणी कृषीपंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी वितरण कंपनीकडे अर्ज दाखल केला आणि कोटेशन प्रमाणे जरुर ती रक्कम दि. २७-०३-२०१५ रोजी भरणा केली. वि.प. यांच्या कोल्हापूर येथील कार्यालयाने जून २०१६ पर्यन्त वीज जोडणी देण्याची हमीही दिली होती. त्याची पूर्तता न झाल्यामुळे तक्रारदार यांनी दि. १३.१०.२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे गा-हाणे दाखल केले. तथापि, सदर कक्षाने दिलेला दि. ०९-१२-२०१६ चा निर्णय समाधानकारक न वाटल्यामुळे तक्रारदार यांनी प्रस्तुतचे अपिल गा-हाणे चा मंचाकडे दाखल केले आहे.

## वितरण कंपनीची भूमिका

३) माहे मार्च २०१५ पर्यन्त मंजूर झालेल्या ज्या ग्राहकांना नविन पायाभूत सुविधा उभारव्या लागतात त्यांची जेष्ठता यादी करुन सदर काम श्रीम इलेक्ट्रीकल्स जयसिंगपूर यांना देणेत आले. जानेवारी २०१५ पर्यन्तचे काम पूर्ण झाले होते. यातील तक्रारदार यांना जोडणी देणेसाठी ३ पोल उभे असून २ पोल उभे करणे आवश्यक आहे. त्याबाबत पाठपुरावा करुनही श्रीम इलेक्ट्रीकल्स यांनी ६ महिने प्रतिसाद दिला नाही. दि. ०१.०२.२०१६ रोजी कंत्राटदारांचे प्रतिनिधी व वि. प. यांचे संबंधीत शाखा अधिकारी यांनी समक्ष जागेवर पाहणी केली असता बाळासाहेब बापू माने यांनी हरकत घेतली व तक्रार अर्ज दिनांक ०९-१२-२०१६ रोजी दाखल केला तसेच प्रदिप जयसिंगराव दळवी व भारती कृष्णा दळवी यांनीही हरकती घेऊन तक्रार अर्ज दिले आहेत. तक्रारदार यांनीच सदर शेतक-यांशी समन्वय साधून आपसात समजूतीने मार्ग काढल्यास वीज जोडणी देता येईल. उपरोक्त कंत्राटदार यांनी गेल्या सहा महिन्यात एकाही ग्राहकाचे काम पूर्ण केलेले नाही. तथापि, त्यांना तक्रारदार यांचे काम करणेची वेळावेळी विनंती केली आहे.

४) सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक ०२.०२.२०१७ रोजी या मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार स्वतः यानी हजर राहून तोंडी निवेदन मांडले आणि त्यांच्या लॅप टॉपवरील काही छायांचित्रे दाखविली वि.प. तर्फे श्री मकरंद दे. आवळेकर कार्यकारी अभियंता व श्री रणजीत पाटील उपकार्यकारी अभियंता हे हजर होते व त्यांनी तोडी युक्तिवाद केला. सर्व उपलब्ध कागदपत्रांचे वाचन करण्यात आले.

५) तक्रारदारांचे गा-हाणे, विप. यांचे म्हणणे , उपलब्ध कागदपत्रे आणि तोंडी निवेदने यांचा विचार करता खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीप्रमाणे निश्चित कालावधीत नविन वीज जोडणी देणेचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) तक्रारदार यांनी मागणी केलेली पिकांची नुकसान भरपाई, झालेल्या खर्चाची भरपाई आणि मानसिक त्रासाची नुकसान भरपाई या मंचाने मंजूर करणे योग्य होईल काय?

उत्तरः- नाही.

३) तक्रारदार यांना विलंबापोटी भरपाई मंजूर करता येईल काय?

उत्तरः- नाही

४) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

## कारणमिमांसा

६) तक्रारदार यांनी B.Sc.(Agri) ही पदवी प्राप्त केल्याचे त्यांचे निवेदन आहे. त्यांनी कृषी क्षेत्रात केलेल्या चांगल्या कामगिरीबद्दल त्यांना शाहू शेतकरी पुरस्कार, शेती भूषण पुरस्कार असे काही पुरस्कार देणेत आलेचे दिसून येत आहे. एकंदरीत, तक्रारदार हे प्रगतीशील शेतकरी आहेत असे म्हणता येईल.

७) तक्रारदार यांनी त्यांच्या गट क्र. ४५४ या जमिनीमधील क्षेत्रामध्ये कुपनलीका खोदून तेथे कृषीपंपासाठी नविन वीज पुरवठा मिळणेसाठी वितरण कंपनीकडे अर्ज केल्यानंतर त्यांनी मंजूरीप्रमाणे रु. ५९००/- इतकी रक्कम दि. २७.०३.२०१५ रोजी वि.प.कडे भरणा केली. तक्रारदार यांचा ग्राहक क्र. २५०१४२२४१३६२ असा आहे. वि.प. यांच्या कोल्हापूर कार्यालयातील अधीक्षक अभियंता यांनी दि. २१.११.२०१५ च्या पत्राने जून २०१६ पर्यन्त वीज जोडणी देता येईल असे तक्रारदार यांना कळविले होते. तथापि त्यांना वीज जोडणी मिळाली नाही आणि त्यामुळे त्यांनी शेवटी दि. ०७-११-२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला.

८) असे दिसून येते की, तक्रारदार यांना वीज जोडणी त्वरीत न मिळाल्याने शेडनेट हाऊससाठी जी मंजूरी मिळाली होती त्याचा लाभ घेता आला नाही.

९) प्रतिक्षा यादीनुसार ताबडतोब कनेक्शन देण्यात यावे अशा अर्थाच्या अंतर्गत तक्रार निवार कक्षाच्या दि. ०९-१२-२०१६ च्या आदेशाने तक्रारदार यांचे समाधान झाले नाही.

१०) वितरण कंपनीतर्फे दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, कोणी बाळासाहेब बापू माने यांनी त्यांच्या घरासमोरुन थ्री फेज वाहिनी नेली जाण्यास हरकत घेतली आणि तसा अर्ज दिनांक ०९-१२-२०१६ रोजी वि.प.कडे सादर केला. तसेच प्रदिप जयसिंगराव दळवी व भारती कृष्णा दळवी (शेत जमिनी गट क्र. ४५६ , ४५७, ४६३, ४६४, ४६५ व ४६६ चे धारक ) यांनी त्यांच्या शेतजमिनीतून व विहीरी जवळून विद्युत वाहिनी नेऊ नये म्हणून हरकती घेऊन दि. २३.१२.२०१६ व दि. २१.१२.२०१६ रोजी तक्रार अर्ज वि.पं. यांच्या संबंधीत कार्यालयात दाखल केले. कंत्राटदार श्रीम इलेक्ट्रीकल्स यांनी तसा अहवाल वि.प. यांचे

उपकार्यकारी अभियंता यांना दिनांक ०२.१२.२०१६ रोजी सादर केलेचे दिसते. वि.प. यांचे तर्फे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना धारकांच्या कृतीची मानके,विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाई निश्चिती करण ) विनियम २०१४ च्या कलम ४.१० याचा आधार घेतला आहे. त्यामध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

"वैधानिक मंजू-या, वहिवाटीचा हक्क , जमिन संपादन किंवा ग्राहकांचा त्यांच्या जबाबदा-या पार पाडण्यातीन विलंब या संदर्भात कोणताही विलंब झाल्यास , जो वितरण परवानाधारकाच्या वाजवी नियंत्रणाच्या बाहेर असेल, त्यासाठी वितरण परवानाधारकास जलबाबदार धरण्यात येणार नाही"

११) वितरण कंपनीतर्फे , मा. विद्युत लोकपाल मुंबई यांनी रिप्रेझेटेशन क्र. ८३/२०१३ यामध्ये दिनाक २५.१०.२०१३ रोजी दिलेल्या निर्णयाचा आधार घेतला आहे. त्या प्रकरणात सौ ज्योत्स्ना जोशी यांना वीज जोडणी देण्यामध्ये रस्तारुंदी करणेच्या कारणावरुन ग्रामपंचायतीने आणि लगतचे शेतकरी श्री पवार यांनी त्यांचे जमिनीत एक पोल उभा करण्यास हरकत घेतली होती. रत्नागिरी ग्राहक मंचाने सौ. जोशी ग्राहक यांचे बाजूने निर्णय दिलेनंतर प्रकरण नुकसान भरपाईचे बाबत मा. विद्युत लोकपाल यांचे समोर गेले.

१२) या प्रकरणात सुध्दा तिन व्यक्तींनी व विशेषत: प्रदीप दळवी व भारती दळवी यांनी त्यांच्या शेत जमिनींमधून विज वाहिनी नेण्यास हरकती घेतल्या आहेत. त्या कारणावरुन आणि वरील नियम ४.१० नुसार विलंबाबद्दल भरपाई मंजूर करता येत नाही. शिवाय तक्रारदार यांनी भरपाईची मागणी तोंडी युक्तीवादात सोडून दिली आहे.

१३) तक्रारदार यांनी अन्य प्रकारची म्हणजे पिकांची नुकसान झालेल्या रु. ८१००/- खर्चाची भरपाई व मानसिक त्रासाची भरपाई वगैरे जी मागणी केली आहे ती ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ च्या कलम ८.२ (३) मधील तरतुदीनुसार (परंतुकानुसार) मंजूर करता येत नाही. अप्रत्यक्ष, परिणामरुप, अनुषंगिक , संधी अथवा लाभाचे नुकसान वगैरेसाठी भरपाई मिळण्याचा ग्राहकास हक्क रहात नाही.

१४) तक्रारदार जे प्रगतीशील शेतकरी आहेत त्यांना शेती पंपासाठी वीज जोडणी मिळणे न्यायाचे आहे अशी या मंचाची स्पष्ट भूमिका आहे. परंतु , काही शेतक-यांच्या हरकतीमुळे वीज जोडणी देण्याच्या कामात अडथळा उत्पन्न होत आहे. अशी वितरण कंपनीचे म्हणणे आहे.तथापि, अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने, तक्रारदार यांना वीज कनेक्शन देणेचा आदेश केलेल आहे. योग्य त्या कायद्याच्या , नियमांचा वापर करुन तक्रारदार यांना वीज जोडणी मिळणे आवश्यक वाटते.

वरील सर्व कारणांचा विचार करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे

**आदेश**

१) तक्रारदार श्री सुशिलकुमार रविंद्र घेवारी रा. अंबप, ता. हातकणंगले जि. कोल्हापूरयांनी या मंचासमोर दाखल केलेले अपिल गा-हाणे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे शेती पंपासाठी नविन वीज जोडणी वि.प. यांनी दिनांक ३१.०५.२०१७ पूर्वी द्यावी असा आदेश करणेत येतो.

३) तक्रारदार यांच्या अन्य मागण्या अमान्य करणेत येत आहेत.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |